उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रादेशिक कार्यालयाची पुनर्रचना व बळकटीकरण

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : युएसजी-१४९३/(२६) मशि-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १७ मे, १९९४

वाचावे : १) शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक :ममव-१०८९/३१५५१/प्रशा-२, दिनांक :२२ जनेवारी,१९९३.

२) शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक :ममब-१०८९/३१५५७/प्रशा-२, दिनांक :२१ मार्च,१९९४.

शासन निर्णय : राज्यातील अकृषी विद्यपीठे व संलग्नीत महाविद्यालये यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. तथापि, या संस्थांच्या नियंत्रणाच्या दृष्टीने उच्च शिक्षण संचालनालयातील कर्मचारीवर्गात आवश्यक ती वाढ झालेली नाही. शासनाच्या शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी व राज्यातील उच्च शिक्षण संस्था सुरळीतपणे चालू रहाव्या व उच्च शिक्षणाचा दर्जा टिकून रहावा यासाठी प्रशासनाचे संनियंत्रण व पर्यवेक्षणाच्या दृष्टीने उच्च शिक्षण संचालनालयाचे बळकटीकरण करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. आता शासन या निर्णयाद्वारे उच्च शिक्षण संचालनालयाच्या मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व जळगांव ( नाशिक ) या ७ ठिकाणी प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान या विभागीय कार्यालयासाठी १९९४-९५ मध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे कर्मचारीवर्गाची ५६ नवीन पदे निर्माण करण्यास मंजूरी देत आहे.

| अ.क. | पदनाम व वेतनश्रेणी | पदांची संख्या | ठिकाण |
|---|---|---|---|
| | | | मुंबई, पुणे, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर, जळगांव. |
| १. | सहसंचालक, उच्च शिक्षण ( रु.३७००-१२५-४७००-१५०-५००० ) | ७ | प्रत्येक ठिकाणी १/१ |
| २. | प्रशासन अधिकारी ( रु.२२००-७५-२८००-१००-४००० ) | ७ | मुंबई-२ पदे, जळगांव सोडून प्रत्येकी एक पद. |
| ३. | वरिष्ठ लेखा परिक्षक ( रु. २०००-६०-२३००-द.रो.७५-३२००-१००-३५०० ) | ७ | प्रत्येकी १/१ पद |
| ४. | उच्चश्रेणी लघुलेखक ( रु.२०००-६०-२३००-द.रो.-७५-३२०० ) | ७ | प्रत्येकी १/१ पद |
| ५. | वरिष्ठ लिपिक ( रु.१२००-३०-१५६०-द.रो.-४०-२०४० ) | ७ | मुंबईला २ पदे, जळगांव सोडून प्रत्येकी १ पद. |
| ६. | वरिष्ठ लिपिक ( रु.१२००-३०-१५६०-द.रो.-४०-२०४० ) | ७ | वरिष्ठ लेखा परिक्षकांना सहाय्य करण्यासाठी प्रत्येकी १/१ पद. |

शाममु/रोटा-एच-521(2000-5-94)।

..........२/-

Joint Director,
Higher Education
Jalgaon R...

NOTARY
ADV. H. H. MUDLIYAR
Opp. District Court,
Jalgaon (MS)
Mob. No. 9823073200
Regd. No. 3948
GOVT. OF INDIA

08 JUL 2016

ATTESTED
ADV. HEMANT H. MUDLIYAR
NOTARY - GOVT. OF INDIA
Basement - J.T.Chambers, HDFC ATM,
Opp. District Court, Jalgaon - 425001.
Tel : 2235125 Mob. 9823073200

Noted & Registered
Sr.No. 3322/16
Date 08 JUL 2016

| अ.क्र. (१) | पदनाम व वेतनश्रेणी (२) | पदांची संख्या (३) | ठिकाण (४) |
|---|---|---|---|
| ७. | वाहन चालक ( रु.९५०-२०-११५०-द.रो.-२५-१५००) | ७ | प्रत्येकी १/१ पद. |
| ८. | शिपाई ( रु. ७५०-१२-८७०-द.रो.-१४-९४०) | ७ | प्रत्येकी १/१ पद. |

एकूण ५६ पदे

कर्मचारीवर्गात एकूण ५६ नवीन पदे त्या त्या संवर्गात अस्थायी वाढ म्हणून समजण्यांत यावी. व ती प्रथम फेब्रुवारी,१९९५ अखेर पर्यन्त चालू ठेवण्यांत यावी व त्यापुढे चालू ठेवण्यासाठी शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण यांनी योग्य वेळी /. त्वरित प्रस्ताव शासनास सादर करावा. सदर पदांवर नियुक्त करण्यांत येणारा कर्मचारीवर्ग शासनाने वेळोवेळी मान्य केलेले भत्ते मिळण्यास पात्र समजण्यांत यावा.

३. राज्यात सध्या अकृषी विद्यापीठे असून सुसूत्रतेच्या दृष्टीने विद्यापीठाच्या भौगोलिक परिक्षेत्रानुसार विभागीय कार्यालयाचे मुख्यालय व कार्यक्षेत्र ठेवल्यास संबंधित विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयांच्या बाबतीत योग्य तो समन्वय व नियंत्रण ठेवणे सुलभ होईल. म्हणून विभागीय कार्यालयाची पुनर्रचना करुन खाली दर्शविल्याप्रमाणे विभागीय कार्यालयाची पुनर्रचना करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. :-

| अ.क्र. (१) | विभागीय कार्यालयाचे (२) | कार्यक्षेत्रातील जिल्हे (३) | कार्यक्षेत्रातील विद्यापीठे (४) |
|---|---|---|---|
| १. | मुंबई | मुंबई, मुंबई उपनगर जिल्हा ठाणे,रायगड,रत्नागिरी, सिंधुदूर्ग | मुंबई विद्यापीठ व नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,बृहन्मुंबई |
| २. | पुणे | पुणे, अहमदनगर,नाशिक | पुणे विद्यापीठ, मुक्त विद्यापीठ, नाशिक व मानीव विद्यापीठे ( गोखले, अर्थशास्त्र संस्था, डेक्कन कॉलेज, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ) |
| ३. | कोल्हापूर | सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर | शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर |
| ४. | जळगांव | जळगांव आणि धुळे | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ |
| ५. | औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, लातूर परभणी, बीड, नांदेड व उस्मानाबाद | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ |
| ६. | नागपूर | नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली | नागपूर विद्यापीठ |
| ७. | अमरावती | अमरावती, यवतमाळ,अकोला बुलढाणा | अमरावती विद्यापीठ |

Joint Director,
Higher Education
Jalgaon Region.

४. नाशिक येथील कार्यालयाचे स्थलांतर

सध्या नाशिक येथील महाविद्यालये पुणे विद्यापीठाशी संलग्न असून धुळें व जळगांव जिल्हयातील महाविद्यालये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत आहेत. त्यामुळे वर दर्शविल्याप्रमाणे पुनर्रचना करतांना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठासाठी नाशिक येथील कार्यालयाचे मंजूर पदांसह जळगांव येथे स्थानांतर करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

NOTARY
ADV. H. H. MUDLIYAR
Opp. District Court,
Jalgaon (MS)
Mob. No. 9823073200
Regd. No. 3948
GOVT. OF INDIA

ATTESTED
ADV. HEMANT H. MUDLIYAR
NOTARY - GOVT. OF INDIA
Basement - J.T. Chambers, HDFC ATM, Opp. District Court, Jalgaon - 425001.
☎ : 2228426 Mob. 9823073200

08 JUL 2016

उपरोक्त पुनर्रचनेमुळे मुंबई विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र सर्वात मोठे असल्यामुळे व जळगांव विभागीय कार्यालय सर्वात लहान होणार असल्यामुळे नव्याने निर्माण होणारे प्रशासन अधिका-याचे १ पद व वरिष्ठ लिपिकाचे १ पद, जळगांव ( नाशिक ) ऐवजी मुंबई विभागीय कार्यालयास मंजूर करण्यांत येत आहे.

५. <u>प्रादेशिक विभागप्रमुख</u>

सध्याच्या प्रशासन अधिका-याऐवजी उच्च शिक्षण सहसंचालक हे विभागीय कार्यालयाचे प्रमुख म्हणून राहतील. त्यांना प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यांत येते. उच्च शिक्षण सहसंचालक यांनी करावयाची कर्तव्ये व जबाबदा-या सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत.

प्रशासकीय अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान यांची कर्तव्ये व जबाबदा-या विवरणपत्र "ब" मध्ये देण्यांत आलेली आहेत.

लघुलेखक यांची कर्तव्ये व जबाबदा-या सोबतच्या विवरणपत्र "क" मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहतील.

अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक कर्मचा-याचे वेतन व वेतनेतर अनुदान मंजूर करुन व या कर्मचा-यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीमधून अग्रिम मंजूर करणे, अंतिम शोधन करणे, वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करणे,वेतन निश्चितीनंतर थकबाकी मंजूर करणे इत्यादी उच्च शिक्षण संचालकांचे अधिकार विभागीय शिक्षण सहसंचालकांना प्रदान करण्यांत येत आहेत. लेखा परिक्षणासाठी विभागीय स्तरावर वरिष्ठ लेखा परिक्षक व त्यांच्या सहाय्यासाठी वरिष्ठ लिपिकांची पदे नव्याने निर्माण करण्यांत आलेली आहेत. अनुदान निर्धारणाची जबाबदारी विभागीय कार्यालयाची असल्याने लेखा परिक्षणाचे काम उच्च शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखाली राहील. त्यांची कर्तव्ये व जबाबदा-या सोबतच्या विवरणपत्र "ड" मध्ये देण्यांत आलेली आहेत.

६. <u>प्रादेशिक नियंत्रण अधिकारी :-</u>

विभागीय सहसंचालक ( उच्च शिक्षण ) हे शैक्षणिक, प्रशासकीय पर्यवेक्षकीय व वित्त अधिकारानुषंगाने प्रादेशिक नियंत्रण अधिकारी म्हणून कार्यरत रहातील. विभागीय कार्यालयासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी समजण्यांत यावे. त्याचप्रमाणे उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली येणारी शासकीय महाविद्यालये, संस्था कार्यालये यांमधील वर्ग-३ व वर्ग-४ या संवर्गातील कर्मचा-यांच्या संदर्भात आस्थापना विषयी सर्व अधिकार त्यांना प्रदान करण्यात येत आहेत.

७. सन १९९४-९५ मध्ये उपरोक्त पदांवर होणा-या खर्चासाठी ( रुपये साठ लाख फक्त )रुपये ६०,००,०००/-(आवर्ती खर्च रुपये २६,२५,०००/- व अनावर्ती खर्च रुपये ३३,७५,०००/-) मंजूर करण्यांत येत आहेत.

८. या बाबीवरील खर्च " २२०२-सर्वसाधारण शिक्षण-०३ 'विद्यापीठीय व उच्च शिक्षण -८० सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (एक)(बी) उच्च शिक्षण संचालनालयाच्या कर्मचारी संख्येत वाढ करणे " - मागणी क्रमांक -डब्ल्यू-२" या शिर्षाखाली १९९४-९५ या वर्षाकरिता मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यांत यावा.

९. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक :१६००/९३/व्यय-५,दिनांक २२ डिसेंबर,१९९३ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

गोतुधनमेहेर

( गो. तु. धनमेहेर )
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे खाजगी सचिव,

मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,

संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे

एच-521(2000-5-94)2

Attested

Jr. Administrative officer,
Higher Education
Jalgaon Region, Jalgaon.

Joint Director,
Higher Education
Jalgaon Region

NOTARY
GOVT. OF INDIA
ADV. H. H. MUDLIYAR
Opp. District Court,
Jalgaon (MS)
Mob. No. 9823073200
Regd. No. 3948

ATTESTED
ADV. HEMANT H. MUDLIYAR
NOTARY - GOVT. OF INDIA
Basement - J.T. Chambers, HDFC ATM,
Opp. District Court, Jalgaon - 425001.
Mob. 9823073200

08 JUL 2016

....4.

संचालक, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई
सचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई
सर्व विभागीय प्रशासन अधिकारी, मुंबई/नागपूर/औरंगाबाद/पुणे/अमरावती/कोल्हापूर/नाशिक जळगांव
संचालक, शासकीय विज्ञान संस्था,मुंबई/नागपूर/औरंगाबाद
सर्व शासकीय अशासकीय अनुदानित व विना अनुदानित कला,वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालये ( उच्च शिक्षण संचालकांच्या मार्फत )
सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु
सर्व. अकृषी विद्यापीठांचे कुलसचिव
महालेखापाल ( लेखा परीक्षा )महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
महालेखापाल ( लेखा अनुज्ञेयता ) महाराष्ट्र १/२,मुंबई / नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी,मुंबई
सर्व जिल्हा कोषाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
जिल्हाधिकारी, मुंबई व बृहन्मुंबई,पुणे,औरंगाबाद,नागपूर,अमरावती,कोल्हापूर,जळगांव
व्यवस्थापक,शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड,मुंबई
वित्त विभाग ( व्यय-५ ),
सर्व मंत्रालयीन विभाग,
उच्च व तंत्रशिक्षण व सेवायोजन विभागातील सर्व कार्यासने
शालेय शिक्षण विभाग,(प्रशा-५)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई (जाहीर प्रसिध्दीकरिता)
खाजगी सचिव (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री )
खाजगी सचिव ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री )
स्वीय सहाय्यक ( सचिव,उच्च व तंत्रशिक्षण )
निवड नस्ती (मशि-१)

Joint Director,
Higher Education,
Jalgaon Region, Jal...

NOTARY
ADV. H. H. MUDLIYAR
Opp. District Court,
Jalgaon (MS)
Mob. No. 9823073200
Regd. No. 3948
GOVT. OF INDIA

ATTESTED 08 JUL 2016
ADV. HEMANT H. MUDLIYAR
NOTARY - GOVT. OF INDIA

एच-521(2000-5-94)2अ

....5.

सहपत्र 'अ'

विभागीय शिक्षण सहसंचालक ( उच्च शिक्षण ) यांची कर्तव्ये व जबाबदा-या

१) प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख म्हणून कामकाज पहाणे व त्याप्रमाणे प्रादेशिक विभाग प्रमुखास विहित असलेले / प्रदान करण्यंत आलेले वित्तीय तथा प्रशासकीय अधिकारांचा अंमल करणे.

२) विभागांतर्गत सर्व सलग्नित असणा-या अशासकीय अनुदानित कला,विज्ञान व वाणिज्य आणि अध्यापक महाविद्यालयांना, तसेच उच्च शिक्षण संस्थांना अनुदान मंजूर करणे ( वेतन, वेतनेतर,परिरक्षण अनुदान )

३) अकृषी विद्यापीठाच्या विविध समित्यांवर शासनाचा/शिक्षण संचालनालयाचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थित रहाणे.

४) अशासकीय अनुदान प्राप्त कला,वाणिज्य,विज्ञान व शिक्षण महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा कार्यभार तपासून शिक्षक व शिक्षकेतर पदांच्या अनुज्ञेयतेस मंजूरी देणे.

५) विभागातील अशासकीय महाविद्यालये / संस्था / विद्यापीठास आवश्यकतेनुसार भेट देणे.

६) नवीन महाविद्यालयांच्या प्रस्तावाना विहित आराखडयाप्रमाणे ( मास्टर प्लॅन ) छाननी करुन परवानगी देण्याबाबत शिफारस करणे.

७) अशासकीय महाविद्यालयांच्या परवानगी, नुतनीकरणाच्या व विस्ताराच्या प्रस्तावांची छाननी करुन त्याबाबत शिफारस करणे.

८) नवीन विद्याशाखा / तुकडया / विषय सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावांना छाननी करुन त्याबाबत शिफारस करणे.

९) अनुदानाचे विहित निकष पूर्ण करणा-या विना अनुदानातील अशासकीय महाविद्यालयांना / विद्याशाखा / तुकडया यांना विषय प्रथमतः अनुदान तत्वावर आणण्यासाठी प्रस्तावांची छाननी करुन त्याबाबत शिफारस करणे.

१०) अकृषी विद्यापीठांतील / संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधीतून अग्रिम मंजूर करणे, अंतिम प्रदान करणे तसेच शिक्षकेतर कर्मच-यांच्या भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदानास मंजूरी देणे.

११) अशासकीय महाविद्यालये / अकृषी विद्यापीठांतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांची वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके मंजूर करणे.

सहपत्र 'ब'

विभागीय शिक्षण सहसंचालक ( उच्च शिक्षण ) यांच्या कार्यालयातील प्रशासन अधिकारी ( उच्च शिक्षण अनुदान ) याची कर्तव्ये व जबाबदा-या.

१) अकृषी विद्यापीठ व विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये यांचे वेतन तथा वेतनेतर अनुदानाचे निर्धारण करणे.

२) शिक्षक / शिक्षकेतर कर्मचां-यांची सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे तपासून महालेखापालांकडे मंजूरी प्रित्यर्थ सादर करणे.

३) अशासकीय महाविद्यालयांतील तसेच विद्यापीठांतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांची वेतन निश्चिती / स्थान निश्चिती करणे.

Joint Director
Higher Education,
Jalgaon Region, Jalgaon

एच-521(2000-5-94)3

NOTARY
ADV. H. H. MUDLIYAR
Opp. District Court,
Jalgaon (MS)
Mob. No. 9823073200
Regd. No. 3948
GOVT. OF INDIA

.....6.

ATTESTED
ADV. HEMANT H. MUDLIYAR
NOTARY - GOVT. OF INDIA
Basement - J.T. Chambers, HDFC ATM,
Opp. District Court, Jalgaon - 425001.
08 JUL 2016

४) सेवानिवृत्ती वेतन / वेतन निश्चितीकरिता एका संस्थेतील विभिन्न महाविद्यालयांतील सेवाखंड क्षमापित करण्याच्या प्रकरणांचे कामकाज पहाणे.

५) विद्यापीठ / महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी अग्रीम मंजूर करणे.

६) भविष्य निर्वाह निधीचे हिशोब अद्ययावत ठेवणे.

७) शिक्षण सहसंचालकांनी / संचालकांनी वेळोवेळी सोपविलेली कामे.

## सहपत्र 'क'

**विभागीय शिक्षण सहसंचालक ( उच्च शिक्षण ) यांच्या कार्यालयातील लघुलेखक (उच्चश्रेणी) यांची कर्तव्ये व जबाबदा-या**

१) कार्यालयतील सर्व अधिका-यांचे इंग्रजी/मराठी श्रुतलेखन घेणे व त्यांचे टंकलेखन करणे.

२) कार्यालयतील प्रारुपाचे / प्रपत्रांचे टंकलेखन करणे.

३) अशासकीय महाविद्यालये तसेच विद्यापीठांचे अनुदान निर्धारण तक्ते/प्रपत्र (इंग्रजी/मराठी) टंकलिखित करणे.

४) विभागीय शिक्षण सहसंचालकांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम पहाणे व गोपनीय व महत्वाचा पत्रव्यवहार हाताळणे.

५) कार्यालयातील सर्व प्रकारच्या गोपनीय स्वरुपातील कामकाज व गोपनीय अहवाल नस्ती अद्ययावत ठेवणे व त्यासंबंधीचे कामकाज पहाणे.

६) कार्यालयातील इंग्रजी / मराठी टकलेखन यंत्र, चक्रमुद्रण यंत्र इत्यादी सुस्थितीत रहातील याकडे लक्ष ठेवून आवश्यकतेनुसार त्यांची दुरुस्ती करवून घेणे.

## सहपत्र 'ड'

**वरिष्ठ लेखापरिक्षक यांची कर्तव्ये व जबाबदा-या.**

१) विभागांतर्गत अनुदानीत अशासकीय महाविद्यालये यांचे व अकृषी विद्यापीठांचे लेखापरिक्षण करणे.

२) प्रियदर्शनी वसतीगृहे यांचे लेखापरीक्षण करणे (अनुदान विषयक )

३) महालेखापालांनी महाविद्यालये व विद्यापीठांच्या लेखा परीक्षणात काढलेल्या आक्षेपांची संबंधित संस्थांशी संपर्क साधून पूर्तता करणे.

४) शासकीय महाविद्यालये, विज्ञान संस्था यांच्या कार्यालयांचे संचालनालयाच्यावतीने लेखा परीक्षण करणे.

५) अशासकीय महाविद्यालयातील शिष्यवृत्तीच्या रक्कमेचे लेखापरीक्षणावरील कामा व्यतिरिक्त वेळोवेळी शासन / शिक्षण संचालनालयाकडून सुचविण्यांत आलेले कामकाज पार पाडणे.

Joint Director
Higher Education,
Jalgaon Region, Jalgaon

NOTARY
ADV. H. H. MUDLIYAR
Opp. District Court,
Jalgaon (MS)
Mob. No. 9823073200
Regd. No. 3948
GOVT. OF INDIA

ATTESTED
ADV. HEMANT H. MUDLIYAR
NOTARY - GOVT. OF INDIA
Basement - J.T. Chambers, HDFC ATM,
Opp. District Court, Jalgaon - 425001.
08 JUL 2016